नोंदणी क्र. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - ६१ Issue - 61 | वार - शनिवार दि. २५ जुलै २०२६ Blow- Saturday Date 25 JULLY 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# नीट पेपरफुटी प्रकरणी फास्ट ट्रॅक कोर्टात सुनावणी होणार




## दोषींना १० वर्षांपर्यंतच्या तुरुंगवासासह १० कोटी रुपयांपर्यंत दंडाची तरतूद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : नीट पेपरफुटी प्रकरणी अटक केलेल्यांच्या विरोधात फास्ट ट्रॅक कोर्टात सुनावणी होणार आहे. दोषींना १० वर्षांपर्यंतच्या तुरुंगवासासह १० कोटी रुपयांपर्यंत दंडाची तरतूद असलेला कठोर कायदा लवकरच केंद्र सरकार संसदेत सादर करणार आहे. पंतप्रधान मोदींनी या संदर्भात घोषणा केली आहे.

पेपरफुटीनंतर तातडीने सुरू असलेली परीक्षा स्थगित करण्यात आली. काही दिवसांनी नव्याने परीक्षा घेण्यात आली. विद्यार्थ्यांना त्यांची संपूर्ण परीक्षा फी परत करण्यात आली आणि नॅशनल टेस्ट एजन्सीने त्यांच्याकडे असलेल्या निधीतून नव्याने परीक्षा घेतली. पुनर्परीक्षेचा निकाल जाहीर झाला. परीक्षेला बसलेल्या २० लाख विद्यार्थ्यांपैकी ११ लाख २१ हजार विद्यार्थी पास झाले. तपास पथकाने पेपरफुटी प्रकरणी सखोल चौकशी करून अनेकांना अटक केली आहे. या प्रकरणात पंतप्रधान मोदींनी दिलेल्या आश्वासनानुसार दिल्लीत फास्ट ट्रॅक कोर्टात सुनावणी होणार आहे.

सुनावणी सुरू होण्याआधी केंद्र सरकार पेपरफुटी प्रकरणी एक कठोर कायदा करण्याच्या तयारीत आहे. या कायद्याचा मसुदा सोमवारी सादर होण्याची शक्यता आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहांनी मसुद्याला मंजुरी दिली तर राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीने त्याचे कायद्यात रुपांतर होईल. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार प्रस्तावीत कायद्यात पेपरफुटी प्रकरणी दोषींसाठी १० वर्षांपर्यंतच्या तुरुंगवासाची आणि १० कोटी रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद असणार आहे. तपास तीन महिन्यांत पूर्ण करण्याची आणि सुनावणी फास्ट ट्रॅक कोर्टात घेण्याचीही तरतूद या कायद्यात असेल, असे समजते. या नव्या तरतुदींचा उद्देश पेपरफुटी माफियांवर कठोर कारवाई करणे आणि सार्वजनिक परीक्षांमधील गैरव्यवहाराच्या प्रकरणांमध्ये जलद न्याय मिळवून देणे हा आहे.

या प्रस्तावातील महत्त्वाची बाब म्हणजे फास्ट-ट्रॅक न्यायालयांची स्थापना. या न्यायालयांना कायद्याद्वारे विशेष अधिकार देण्यात येणार आहेत. या न्यायालयांमध्ये पेपरफुटीच्या प्रत्येक प्रकरणाचा तपास आणि अंतिम निकाल अवघ्या तीन महिन्यांत पूर्ण करणे बंधनकारक असेल. परीक्षा गैरव्यवहारात सहभागी असलेल्या आरोपींसाठी अधिक कठोर शिक्षेचा प्रस्ताव तयार केला आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, दोषींना कमाल १० वर्षांचा तुरुंगवास आणि १० कोटी रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. अशा शिक्षेमुळे पेपरफुटीच्या संघटित टोळ्यांवर मोठा प्रतिबंध निर्माण होईल, असा सरकारचा विश्वास आहे.या सर्व प्रस्तावांवर शुक्रवारी झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.


नीट परीक्षेतील पेपरफुटी आणि इतर अनियमिततेच्या आरोपांनंतर देशभरात विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर आंदोलन करत आहेत. विरोधी पक्षांनीही सरकारवर टीका करत दोषींवर कठोर कारवाई आणि शिक्षण व्यवस्थेतील सुधारणा करण्याची मागणी केली आहे .या पार्श्वभूमीवर सरकारने सार्वजनिक परीक्षांची विश्वासार्हता कायम राखण्यासाठी अधिक कडक कायदेशीर व्यवस्था उभारण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारच्या नव्या प्रस्तावांमुळे केवळ शिक्षाच कठोर होणार नाही तर कायद्याची अंमलबजावणी अधिक प्रभावी केली जाईल आणि प्रत्येक प्रकरणाचा निकाल निश्चित कालमर्यादेत दिला जाईल. वेगवेगळ्या राज्यांमध्ये पसरलेल्या संघटित पेपरफुटी नेटवर्कचा संपूर्णपणे बंदोबस्त करणे, तपास आणि खटल्यातील विलंब टाळणे आणि दोषींना जलद शिक्षा मिळवून देणे, हा या नव्या कायदेशीर चौकटीचा प्रमुख उद्देश आहे.

# पेपर फुटीच्या खटल्यांसाठी महाराष्ट्रात दोन 'फास्ट ट्रॅक' कोर्ट; पंतप्रधानांच्या घोषणेची अंमलबजावणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : वैद्यकीय प्रवेश परीक्षा 'नीट'सह इतर विविध स्पर्धा परीक्षांच्या पेपर फुटीप्रकरणी कठोर कारवाई करण्यासाठी आणि संबंधित खटल्यांचा लवकरात लवकर निपटारा करण्यासाठी महाराष्ट्रात दोन 'फास्ट ट्रॅक' न्यायालये स्थापन करण्यात आली आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या घोषणेच्या अंमलबजावणीचा भाग म्हणून नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर येथे ही न्यायालये कार्यरत असणार आहेत.

केंद्र सरकारच्या विशेष विनंतीवरून मुंबई उच्च न्यायालयाच्या मार्गदर्शनाखाली ही विशेष न्यायालये स्थापन करण्यात आली आहेत. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे कार्यकारी मुख्य न्यायाधीश रवींद्र व्ही. घुगे यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील परीक्षांमधील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी दोन प्रमुख शहरांमध्ये ही व्यवस्था करण्यात आली आहे. दिल्ली उच्च न्यायालयानेही अशाच



प्रकारचे विशेष न्यायालय स्थापन करून तेथे न्यायमूर्ती अनु ग्रोव्हर बलिगा यांची नियुक्ती केली आहे. त्याच धर्तीवर आता महाराष्ट्रातही ही कार्यवाही करण्यात आली आहे.

नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर येथील ही विशेष न्यायालये 'सार्वजनिक परीक्षा (अन्फेअर मीन्स प्रतिबंधक) कायदा, २०२४' तसेच 'भारतीय न्याय संहिता, २०२३' अंतर्गत दाखल प्रकरणांची सुनावणी घेणार आहेत. विशेष म्हणजे, २०२४ च्या नवीन कायद्यानुसार या न्यायालयांना दाखल झालेल्या खटल्यांची सुनावणी पूर्ण करून तीन महिन्यांच्या आत निर्णय देणे बंधनकारक करण्यात आले आहे.

या गंभीर आणि संवेदनशील प्रकरणांची सुनावणी करण्यासाठी अनुभवी न्यायिक अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याची सूचना केंद्र सरकारने केली होती. त्यानुसार मुंबई उच्च न्यायालयाने छत्रपती संभाजीनगर येथील विशेष न्यायालयाचे कामकाज न्यायाधीश एस. व्ही. पवार यांच्याकडे, तर नागपूर येथील न्यायालयाचे कामकाज न्यायाधीश गुलशन कोलते यांच्याकडे सोपवले आहे.

# हिमाचलमध्ये कारवर दरड कोसळली, १३ जणांचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शिमला : हिमाचल प्रदेशमधील लाहौल स्पीती परिसरातील पांगी-उदयपूर मार्गावर दुपारी एक दुर्दैवी घटना घडली आहे. घाटातून जाणाऱ्या एका टाटा सुमो कारवर दरड कोसळल्याने बाळासह १३ जणांचा मृत्यू झाला आहे. या सुमो कारमध्ये १५ जण प्रवास करत होते, त्यापैकी १३ जणांचा मृत्यू झाला आहे.

लाहौल घाटापासून ६० ते ७० किलोमीटर अंतरावर कुडूमाला परिसरात अपघात झाला आहे. घाटातून जाताना सुमो एसयूव्हीवर डोंगराचा मोठा भाग कोसळल्याने वाहतूकही ठप्प झाली होती. हा अपघात इतका भीषण होता की, कारचा अक्षरशः चक्काचूर झाला आहे. सुमोची फक्त नंबर प्लेट दिसत आहे. घटनेत सहा महिन्याच्या बाळाचा



मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.भरमौर-पाँगीचे आमदार जनक राज यांनी अपघाताबाबत सविस्तर माहिती दिली. पांगी-उदयपूर मार्गावर ज्या सुमोचा अपघात त्या गाडीत १५ जण होते. गाडीतील १३ जणांचा अपघातात मृत्यू झाला, असे आमदार जनक राज यांनी सांगितले.

घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि स्थानिक प्रशासनाने घटनास्थळी धाव घेतली आहे. घटनास्थळी बचावकार्य सुरू आहे. दरड हटवण्याचे काम हाती घेण्यात आलं आहे. अपघात इतका भीषण आहे की मृतदेहांची ओळख पटवणेही कठीण झाले आहे. डोंगरावरून दगड कोसळल्यानंतर गाडीच्या मागील भागात आग लागली, जी घटनास्थळी उपस्थित असलेल्या लोकांनी आणि जवानांनी विझवण्याचा प्रयत्न केला.

महामार्ग काही दिवस होता बंद

काही दिवसांपासून उदयपूर-किलाड मार्ग बंद ठेवण्यात आला होता. यामुळे पर्यटकांची वाहने तिंदी परिसरात थांबवली जात होती. मार्ग सुरू झाल्यानंतर ही अपघाताची घटना घडली आहे. शुक्रवारी सकाळी मंडी जिल्ह्यातील जोगिंद्रनगर येथील गुम्मामध्ये भूस्खलन झाले होते. या दुर्घटनेमध्ये दोन कुटुंबं मातीच्या ढिगाऱ्याखाली सापडली होती. यामध्ये एका महिलेचा मृत्यू झाला तर ७ जण जखमी झाले होते. हिमाचल प्रदेशमध्ये आठवड्याभरात दोन मोठ्या दुर्घटना झाल्याने परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

### मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत 'निर्मलवारी-समृद्धवारी' व 'चरणसेवा' उपक्रमाचा समारोप

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

# वारकऱ्यांच्या चरणसेवेच्या माध्यमातून भारताच्या युवा शक्तीचे दर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर, दि.२४: चरणसेवा उपक्रमाच्या माध्यमातून डॉक्टर आणि स्वयंसेवक आपल्या आई वडिलांप्रमाणे भक्तीभावाने थकलेल्या वारकऱ्यांची चरणसेवा केली आणि त्यांना सर्व प्रकारच्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन दिल्या. वारकऱ्यांच्या सेवेच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने

भारताच्या युवा शक्तीचे चित्र, भारत आणि महाराष्ट्र धर्म पाहायला मिळतो, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

पंचायत समिती, पंढरपूर येथे ग्रामविकास आणि पंचायतराज विभागातर्फे आयोजित 'निर्मलवारी-समृद्धवारी' आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाच्या 'चरणसेवा' उपक्रमाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. यावेळी जलसंपदा तथा आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, ग्रामविकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे उपस्थित होते.

श्री. फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रसारख्या पुरोगामी आणि भक्ती मार्गाची समृद्ध परंपरा असलेल्या या राज्यात वारकऱ्यांसाठी सुविधा




उपलब्ध करुन देणे राज्य शासनाचे कर्तव्य आहे. त्यादृष्टीने सन २०१६ पासून सेवा सहयोग संस्थेच्या माध्यमातून पहिल्यांदा निर्मल वारी उपक्रम सुरु केला आणि सन २०१७ पासून राज्याच्या अर्थसंकल्पात आणून जिल्हा प्रशासन आणि सहयोग संस्था माध्यमातून वारी निर्मल वारी करण्याच्यादृष्टीने मोठ्या प्रमाणात शौचालय, स्नानगृह, स्वच्छता आदी व्यवस्था सुविधा सुरु केल्या. वारकऱ्यामध्ये विठू माऊली असल्याने त्याची सेवा करणे हे आपले परम कर्तव्य मानून या भावनेतून या व्यवस्था निर्माण करण्यात आल्या आहेत.

मुख्यमंत्री म्हणाले, संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यासोबत इतर दिंड्याकरिता शौचालयाची व्यवस्था करण्यात आली. वारी दरम्यान १३ लाख चौरस फूट जर्मन हँगर करण्यात आले. ५ हजार फिरती शौचालये देण्यात आली. वारीला निर्मलवारी करणारे स्वच्छतादूत हे देवदूतच आहेत. राज्यातील १४ जिल्ह्यात वारीच्या अनुषंगाने अतिशय उत्तम नियोजन करण्यात आले असून याबाबत वारकऱ्यांनी समाधान व्यक्त केले, असेही ते म्हणाले.

पंढरपूर येथील वाळवंट स्वच्छ करुन चंद्रभागा नदीचे पाणी स्वच्छ पोहोचविण्याच्यादृष्टीने व्यवस्था करण्यात आली आहे. सुमारे ३० ते ३५ लाख वारकरी पंढरपूर येथे आल्यानंतरही संपूर्ण पंढरपूर स्वच्छ दिसत आहे. वारीचा कालावधी संपल्यानंतरही पंढरपूर असेच स्वच्छ राहील, अशी अपेक्षा श्री. फडणवीस यांनी व्यक्त केली. मुख्यमंत्र्यांनी यावेळी लोकप्रतिनिधी, सोलापूर, सातारा आणि पुणे जिल्हाप्रशासन, पोलीस प्रशासन, विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी, निर्मलवारीमध्ये विविध परंपरांच्या माध्यमातून जनजागृती करणारे कलावंत तसेच वारी यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान देणाऱ्या सर्व घटकांचे कामाचे कौतुक केले. श्री. गोरे म्हणाले, वारीमध्ये वारकऱ्यांना सुविधा देताना स्वच्छतेला प्राधान्य देण्यात आले. चरणसेवा उपक्रमासोबतच मुख्यमंत्री वारकरी सुविधा केंद्रामध्ये, हिरकणी कक्ष, रुग्णालय, शौचालय, स्नानगृह, जर्मन हँगर, मोबाईल चार्जिंग वाहन आदी उपलब्ध करुन देण्यात आल्या. त्यांना हक्काच्या मुक्कामाचे ठिकाण उपलब्ध करुन देण्यात आल्याबद्दल वारकरी समाधान व्यक्त करीत होते. यामध्ये जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन, सेवा भावी संस्था, स्वच्छता दूत, नागरिक यांनी मनापासून योगदान दिले. स्वच्छता कर्मचाऱ्यांनी जबाबदारी न समजता सेवा म्हणून कार्य केले. यामुळे ही संपूर्ण वारी साथीच्या रोगापासून मुक्त झाली आहे, वाळवंट व चंद्रभागा नदी स्वच्छ करण्यात आली असून एकूणच संपूर्ण पंढरी स्वच्छ करुन वारकऱ्यांच्या स्वागतासाठी सज्ज करण्यात आली आहे. आषाढीवारीमध्ये सर्व वयोगटातील नागरिक सहभागी होवून राज्य शासनाच्या सर्व सेवांचा लाभ घेतला आहे, असेही श्री. गोरे म्हणाले. श्री. जैन यांनी आषाढीवारीमध्ये सहभागी वारकऱ्यांसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सुविधांची माहिती दिली. सातारा, सोलापूर जिल्ह्यात १३ लाख चौरस फूट जर्मन हँगर, ७ लाख ८० चौरस फूट जलरोधक मंडप उभारण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते स्वच्छ भारत मोहिमेत महाराष्ट्र प्रथम स्थानी आल्याबद्दल संचालक शेखर रौंदळ तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाच्या 'चरण-सेवा' उपक्रमात सेवा बजावणाऱ्या डॉक्टर व सेवा भावी संस्था आणि आषाढी वारीतील स्वच्छतादूतांचा सन्मान करण्यात आला. 'स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०२६' बोधचिन्हाचे अनावरणही याप्रसंगी करण्यात आले. कार्यक्रमात 'निर्मलवारी-समृद्धवारी' व 'चरणसेवा' उपक्रमाचे माहितीपट दाखविण्यात आले. कार्यक्रमाला आमदार राजेंद्र राऊत, गोपीचंद पडळकर, समाधान आवताडे, अभिजीत पाटील, विजयकुमार देशमुख, नारायण पाटील, नंदकिशोर महाजन, माजी आमदार प्रशांत परिचारक, जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, विभागीय आयुक्त शितल तेली-उगले, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक आदी उपस्थित होते.

दैनिक
यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### टॅरिफ बॉम्ब

मध्य पूर्वेतील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एक अत्यंत कठोर आणि मोठा आर्थिक निर्णय घेतला आहे. सक्तीच्या मजुरीचा वापर करून बनवलेल्या उत्पादनांविरोधात कठोर पाऊल उचलत ट्रम्प प्रशासनाने भारतासह तब्बल १७ देशांविरोधात अतिरिक्त शुल्क लादण्याची घोषणा केली आहे. अमेरिकेच्या व्यापार प्रतिनिधी कार्यालयाने कलम ३०१ अंतर्गत हा निर्णय घेतला असून, हा नवीन टॅरिफ शुक्रवारपासून लागू होणार आहे. युएसटीआरनुसार, ज्या देशांनी सक्तीच्या मजुरीचा वापर करून उत्पादने तयार करण्याच्या प्रवृत्तीविरोधात पुरेशी आणि कठोर कारवाई केली नाही, त्या देशांच्या आयातीवर हा अतिरिक्त टॅरिफ लादण्यात आला आहे. ट्रम्प यांच्या आदेशानंतर जगभरातील ६० व्यापारी भागीदार देशांच्या धोरणांचा सखोल आढावा घेण्यात आला, त्यानंतर हा निर्णय जाहीर करण्यात आला. अमेरिकेचे व्यापार प्रतिनिधी जेम्सन ग्रीर यांनी सांगितले की, या पावलामुळे मानवी हक्कांचे उल्लंघन आणि अन्यायकारक व्यापार पद्धतींना आळा बसेल. या अर्थव्यवस्थांना सक्तीच्या मजुरीविरोधात प्रभावी पावले उचलण्यास प्रवृत्त करण्यासाठी हा टॅरिफ लादण्यात आला आहे. भारतासोबतच, अमेरिकेने पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, अर्जेंटिना, कंबोडिया, कॅनडा, इक्वेडोर, एल साल्वाडोर, ग्वाटेमाला, होंडुरास, इंडोनेशिया, जॉर्डन, मलेशिया, मेक्सिको, त्रिनिदाद आणि टोबॅगो, आणि युनायटेड किंगडमवर १० टक्के शुल्क लादले आहे. इतर अनेक देशांवर १२.५ टक्के शुल्क लादण्यात आले आहे. भारतावर शुल्क कमी का ठेवण्यात आले? विशेष म्हणजे, इतर काही देशांच्या तुलनेत ट्रम्प प्रशासनाने भारताला कमी शुल्काच्या श्रेणीत (१० टक्के) ठेवले आहे.

# वारीतील वारकऱ्यांसाठी वैरागच्या योग साधकांनी चरण सेवेसोबत साधला योग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वैराग/प्रतिनिधी : आषाढी एकादशी निमित्त निमित्त विठुरायाच्या दर्शनासाठी लाखो वैष्णव भक्त पंढरपूरच्या दिशेने वारीमध्ये पालखी सोहळ्यासोबत चालत येत आहेत . या वारकऱ्यांसाठी वैराग येथील संत नामदेव योग प्रशिक्षण केंद्राच्या वतीने हजारो वारकऱ्यांची मोफत चरण सेवा करून त्यांचा शारीरिक थकवा दूर करण्यासाठी योगाचे धडे देण्यात आले .

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष व

वैराग येथील संत नामदेव प्रशिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले . संत सोपान काका , संत मुक्ताई आणि जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यासोबत पायी चालणाऱ्या भाविक वारकऱ्यांसाठी चरण सेवा व योग सेवा असा आरोग्य विषयक उपक्रम राबविण्यात आला .

वारीच्या वाटेवरील शेंद्री ,बोरगाव , अकलूज येथे संत नामदेव योग केंद्राच्या साधकांनी सुमारे तिन हजार भाविक वारकऱ्यांची भावपूर्ण चरण सेवा ( मालिश ) केली .आणि आरोग्यदायी योग वर्ग घेतले .

पायी वारीच्या प्रवासात सातत्याने चालल्यामुळे वारकऱ्यांच्या पायावर कमरेवर आणि शरीरावर येणारा प्रचंड ताण दूर व्हावा या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला .

वैराग येथील श्री संत नामदेव प्रशिक्षण केंद्रास मुख्यमंत्री सचिवालय अंतर्गत मुख्यमंत्री वैद्यकीय



वैराग येथील संत नामदेव योग केंद्रातील साधक वारकऱ्यांना योगाचे धडे देताना व चरण सेवा बजावताना दिसत आहेत .

सहायता कक्षाच्या सोलापूर शाखेच्या वतीने श्रीक्षेत्र पंढरपूर आषाढी एकादशी वारीमध्ये सहभागी होणाऱ्या भाविकांसाठी आपल्या केंद्राच्या वतीने आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यास आव्हान करण्यात आले होते त्यानुसार केंद्र संचालक श्री दत्तात्रय उंडाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे १२० साधकांनी विविध ठिकाणी हजारो वारकऱ्यांची चरण सेवा केली . तसेच पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांना योगाचे धडे दिले .

योगासने व चरण सेवा :

पायी वारीच्या प्रवासात सातत्याने चालल्यामुळे भाविकांच्या पायाचे स्नायू कडक होतात . यासाठी योग प्रशिक्षकांनी वारकऱ्याकडून सूक्ष्म व्यायाम ,पाद प्रसारण , पवन मुक्तासन आणि वज्रासन यासारखी सोपी व तात्काळ आराम देणारी योगासने करून घेतली .मानसिक प्रसन्नता व शांतपणा वाटण्यासाठी प्राणायाम व ध्यान , अनुलोम -विलोम व ब्राह्मरी प्राणायामाचा सराव करून घेतला . याशिवाय वारकऱ्यांच्या पायांना तेल लावून शास्त्रीय पद्धतीने मसाज करण्यात आला व स्ट्रेचिंग करून त्यांचा थकवा दूर करण्यास मदत केली .

वारीच्या वाटेवर या आरोग्यदायी सेवेमुळे भावीक वारकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आले . अनेक दिवस पायी चालल्यामुळे काहींचे पाय जड झाले होते . मात्र योग्य प्रशिक्षकांनी केलेल्या आरोग्यदायी सेवेमुळे त्यांचा थकवा निघून गेल्याची भावना भाविकांनी व्यक्त केल्या .

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीस अध्याधुनिक रुग्णवाहिका भेट



### नगराध्यक्ष डॉक्टर प्रणिता ताई भालके यांच्या मागणीला यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर नगरपालिकेच्या नगराध्यक्ष डॉक्टर सौ प्रणिता भालके यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती साठी येणाऱ्या लाखो भाविकांच्या आरोग्यासाठी मंदिर समितीस सुरक्षेच्या दृष्टीने अत्याधुनिक रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्याची मागणी महाराष्ट्र राज्याची उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्याकडे केली होती या मागणीची दखल घेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीस अत्याधुनिक वैद्यकीय सुविधांनी सुसज्ज रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली व या रुग्णवाहिकेचे लोकार्पण राज्याचे रोजगार हमी योजना फलोत्पादन खारभूमी विकास मंत्री माननीय भरत शेठ गोगावले यांच्या शुभहस्ते संपन्न झाली यावेळी मंदिर समितीचे सहा अध्यक्ष घेण्यात महाराज औसेकर महाराज मंदिर समितीचे सदस्य शकुंतला नडगिरी प्रशासकीय अधिकारी राजेंद्र शेळके पंढरपूर तालुका वैद्यकीय अधिकारी डॉक्टर एकनाथ बोधले शिवसेनेचे नाना मोरे नाना निंबाळकर गोविंद पवार सुधीर घोडके डॉक्टर संतोष यादव नवनाथ लोखंडे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते पंढरपूरच्या आषाढी कार्तिकी इतर उत्सवाच्या काळात लाखो भाविक दर्शनासाठी येत असतात व अशावेळी आपत्कालीन वैद्यकीय सेवा तातडीने उपलब्ध होणे अत्यंत आवश्यक असते नावाने उपलब्ध झालेल्या या अत्याधुनिक रुग्णवाहिकेमुळे आपत्कालीन परिस्थितीत भाविकाना त्वरित उपचारासाठी रुगणालयात हलविणे साठी अलिक सुलभ होणार असून मंदिर समिती परिसरातील आरोग्यसेवा अधिक सक्षम होणार असे असल्याची माहिती पंढरपूर नगरपालिकेच्या लोकनियुक्त नगराध्यक्षया यानि उपमुख्यमंत्री माननीय एकनाथजी शिंदे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर तसेच मंत्री माननीय भरत शेठ गोगावले यांच्या मनःपूर्वक आभार मानले व भाविकांच्या सेवेसाठी शासनाने घेतलेला हा निर्णय मुळे श्री क्षेत्र पंढरपुरातील आरोग्य सुविधांमध्ये मोठी भर पडणार असून लाखो वारकरी व भाविकांना त्याचा लाभ होणार आहे.

# दुधनी-भीमनगर कन्नड शाळेत आषाढी वारीनिमित्त बाल दिंडी उत्साहात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधनी /प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील दुधनी-भीमनगर येथील कन्नड शाळेत आषाढी एकादशीच्या निमित्ताने आषाढी वारी बाल दिंडी मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांचा पारंपरिक वेश परिधान करून टाळ, मृदुंग, भगवे ध्वज तसेच विठ्ठल-रुक्मिणी यांच्या प्रतिमांसह दिंडीत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. ज्ञानोबा-तुकाराम आणि पांडुरंग हरी या जयघोषांनी परिसर भक्तिमय झाला.

या कार्यक्रमाचे नेतृत्व मुख्याध्यापक श्री प्रकाश नाईक सर, श्री महेश गायकवाड सर , श्रीमती लक्ष्मी देगाव मॅडम , श्रीमती अर्चना गवई मॅडम दिव्या बसवनकेरी मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली दिंडीचे नियोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बसवराज जन्ना होते. यावेळी शिक्षण-तज्ज्ञ सैदप्पा शिवयोगी, निंगप्पा निंबाळ, विश्वनाथ रेऊर, सम्राट झळकी आणि गीतेश तोरणकर सैदप्पा झळकी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

दिंडीदरम्यान विद्यार्थ्यांनी अभंग, भजन आणि संतवाणी सादर केली. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना संत परंपरेचे महत्त्व, आषाढी वारीची परंपरा, संस्कार, शिस्त आणि सामाजिक ऐक्य यांविषयी मार्गदर्शन केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये भक्तीभाव, सांस्कृतिक जाणीव आणि सामाजिक मूल्यांची जोपासना होण्यास मदत झाली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, शाळा व्यवस्थापन समिती तसेच पालकांनी मोलाचे सहकार्य केले.

# अनंत चैतन्य प्रशालेचा आषाढी दिंडी सोहळा भक्तीमय वातावरणात संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक व धार्मिक वैशिष्ट्य मानले जाणारे विष्णुमय जग,वैष्णवांचा धर्म

भेदाभेद भ्रम अमंगळ किंवा हरिहरा भेद नाही अशा स्वरूपाचे सर्वधर्मसमभावाचे शिकवण देणारे वारकरी संप्रदाय विठुमाऊलीच्या दर्शनाच्या ओढीने आसुसलेला, ऊन, वारा, पाऊस कशाचीही तमा न बाळगता,घरदार सोडून,वय विसरून बेभान होऊन पंढरपुर च्या दिशेने निघालेला, नित्यनेमाने वारी करणारा वारकरी व त्याची भक्ती याची अनुभूती व्हावी याकरिता -महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्यमिक प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय हन्नूर येथे आज वारी पर्यावरण रक्षणाची व विठुमाऊलीचा दिंडी सोहळा कार्यक्रम अतिशय उस्फूर्त प्रतिसादात संपन्न झाला.

प्रारंभी प्राचार्य ज्ञानदेव शिंदे यांच्या हस्ते विठ्ठल- रुक्मिणी माता पालखी, ज्ञानेश्वर महाराज पालखी व तुकाराम महाराज पालखी या तिन्ही पालखीची पुजा करून आरती करण्यात आली.

यानंतर शाळेपासून ते गावातून दिंडी निघाली तेंव्हा गावातील अनेक माताभगिनीनी विठ्ठल- रुक्मिणी पालखीचे पाणी घालून, नारळ फोडून जंगी स्वागत केले .टाळ, मृदुंग, वीणा , कपाळास टीळा,गळ्यात तुळशीमाळ घालून,वैष्णव पताका खांद्यावर घेऊन ,मुखाने हरिनामाचा जयघोष करत,झिम्मा ,फुगडी, कोलांट उडी,रिंगण ,भजन करत निघालेली पांढऱ्या वेशभूषेतील मुले व साडी नेसलेल्या मुलींमुळे जणू वारीचेच स्वरूप आले होते.व मुलां-मुलींनी या दिंडी सोबतच गावकऱ्यांना वारीच्या माध्यमातून पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला.

अप्रतिम अशा या दिंडी सोहळा व पर्यावरण रक्षणाच्या वारीचे संस्थेचे अध्यक्ष तथा आमदार मा. सचिनदादा कल्याणशेट्टी, संस्थेचे जेष्ठ संचालक व मार्गदर्शक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्रशालेचे माजी प्राचार्य तथा आधारवड मा. सिध्देश्वर कल्याणशेट्टी,संस्थेच्या संचालिका व जि.प. सदस्या शांभवीताई कल्याणशेट्टी,उपसभापती मा.सागरदादा कल्याणशेट्टी,संचालक मल्लिकार्जुन मसुती, संस्थेच्या सी. ई. ओ. रुपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख पुनम कोकळगी यांनी कौतुकासह अभिनंदन केले. ही वारी यशस्वी करण्यासाठी प्रशालेचे समस्त शिक्षक बंधू- भगिनी, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# दिल्ली येथील जंतर मंतर आंदोलनास रिपाइं तुळजापूर तालुक्याच्या वतीने जाहीर पाठिंबा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस.के. गायकवाड) : वैद्यकीय शिक्षण प्रवेश पूर्व या परीक्षेचा पेपरफुटी प्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना तात्काळ निलंबित करण्याच्या मागणीसाठी दिल्ली येथील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या आंदोलनास तसेच आंदोलनाचे नेतृत्व करणारे श्री. अभिजीत दिपके व प्रख्यात वैज्ञानिक सोनम वांगचुक यांना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया () तालुका शाखा तुळजापूरच्या वतीने चा जाहीर पाठिंबा देण्यात येत असून आंदोलकावर लाठी चार्ज करणाऱ्या पोलिसांचा जाहीर निषेध करण्यात येत आहे

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया () चे राष्ट्रीय अध्यक्ष मा. दीपकभाऊ निकाळजे व राष्ट्रीय महासचिव माननीय मोहनलाल पाटील साहेब यांच्या निर्देशानुसार महाराष्ट्र प्रदेशअध्यक्ष बाळासाहेब पवार यांला मार्गदर्शनाखाली या संदर्भात तुळजापूर तालुक्याचे तहसीलदार व धाराशिव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांच्यामार्फत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे तालुका अध्यक्ष उमेश गायकवाड यांनी देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की वैद्यकीय प्रवेश परीक्षा सह देशातील विविध स्पर्धा परीक्षा व भरती प्रक्रियांमधील कथित पेपरफुटीच्या घटनांमुळे विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान झाले असून, देशातील वीस विद्यार्थ्यांनी आत्महत्या केलीआहे. या प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी दिल्ली येथील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या अभिजीत दिपके सोनम वांगचूक यांच्या आंदोलनाला रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) चा संपूर्ण जाहीर पाठिंबा देण्यात येत असून खालील मागण्या करण्यात येत आहेत.

१. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे. २. परीक्षा पेपरफुटी प्रकरणाची निष्पक्ष, पारदर्शक व वेळबद्ध चौकशी करण्यात यावी. ३. दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करून विद्यार्थ्यांना न्याय मिळवून द्यावा. ४. शांततामय आंदोलन करणाऱ्या आंदोलनकर्त्यांच्या लोकशाही हक्कांचे संरक्षण करण्यात यावे.आदी मागण्य करून देशातील विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी केंद्र सरकारने या निवेदनाची तातडीने दखल घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी, असी विनंती करण्यात आली आहे.




तुळजापूर तहसीलदार यांना देण्यात आलेल्या निवेदनावर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आ) चे तालुका अध्यक्ष उमेश गायकवाड यांच्यासह कार्यकर्त्यांच्या सह्या आहेत

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## सामाजिक बांधिलकीचा आदर्श; महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई शाखा ठाणे जिल्हाच्या वतीने

# विद्यार्थ्यांचा गुणगौरव, शैक्षणिक साहित्य व पत्रकारांना रेनकोटचे वाटप

### पाच्छापूरच्या अतिदुर्गम भागातील १०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य; पूररक्षक पोलीस अधिकारी, एव्हरेस्टवीर व उत्कृष्ट क्रिकेटपटूंचा गौरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई शाखा ठाणे जिल्हा यांच्या वतीने भिवंडी तालुक्यातील अतिदुर्गम पाच्छापूर केंद्रातील नेवाडे, केल्हे, उंबरखांड आणि बरफपाडा येथील जिल्हा परिषद मराठी शाळांतील विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा नेवाडे समाजहॉल येथे उत्साहात पार पडला. यावेळी सुमारे १०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून सामाजिक बांधिलकीचा आदर्श घालून देण्यात आला. तसेच पावसाळ्यात अहोरात्र वृत्तांकन करणाऱ्या पत्रकारांना रेनकोटचे वाटप करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस विश्वासराव आरोटे होते. ठाणे जिल्हाध्यक्ष भगवान चंदे, सामाजिक कार्यकर्ते साजिद खोत आणि दत्ता शेठ ठाकरे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. यावेळी पूरपरिस्थितीत नागरिकांना सुखरूप बाहेर काढून उल्लेखनीय कामगिरी करणारे पडघा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पंकज गिरी, उत्कृष्ट क्रिकेटपटू अद्वेत जाधव तसेच एव्हरेस्ट शिखर सर करणारे मिहिर जाधव यांचा महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

अध्यक्षीय मनोगतात विश्वासराव आरोटे म्हणाले,.विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप हा केवळ एक उपक्रम नसून समाजाप्रती असलेल्या बांधिलकीचा भाग आहे. शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम आणि सुसंस्कृत समाजाची निर्मिती होऊ शकते. प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षणासाठी आवश्यक साधने उपलब्ध करून देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. पत्रकारिता ही केवळ बातम्या देण्यापुरती मर्यादित



नसून समाजातील गरज ओळखून त्यासाठी पुढाकार घेणे हीदेखील पत्रकारांची जबाबदारी आहे. पत्रकार हा समाजाचा आरसा असून सत्याला वाचा फोडण्याबरोबरच सामाजिक बांधिलकी जपत जनहितासाठी कार्य करणारा संवेदनशील चेहरा आहे.

मुसळधार पावसातही जनतेपर्यंत अचूक व तात्काळ बातम्या पोहोचविण्यासाठी पत्रकारांना प्रत्यक्ष मैदानात उतरून काम करावे लागते. त्यांच्या या कर्तव्यनिष्ठेचा सन्मान म्हणून राज्य सरचिटणीस विश्वासराव आरोटे आणि ठाणे जिल्हाध्यक्ष भगवान चंदे यांच्या हस्ते पत्रकारांना रेनकोटचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे पावसाळ्यात वृत्तांकन करताना पत्रकारांना संरक्षण मिळणार असून त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

ठाणे जिल्हाध्यक्ष भगवान चंदे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की,

पत्रकारांनी नेहमीच सामाजिक प्रश्नांवर आवाज उठवत गरजूंच्या मदतीसाठी पुढाकार घेतला आहे. अशा उपक्रमांतून पत्रकारांची सामाजिक बांधिलकी अधिक दृढ होते आणि समाजात सकारात्मक संदेश जातो. पत्रकारांनी केवळ निरीक्षक न राहता समाजपरिवर्तनाचे सक्रिय घटक म्हणून कार्य करत राहिले पाहिजे.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून पडघा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पंकज गिरी, अशोक शेरेकर, भगवान भोईर, तानाजी मोरे, ग्रामपंचायत अधिकारी जितेंद्र मुरांजन, सरपंच प्रेमा हिंदोळे, केंद्रप्रमुख विनायक भालेराव, संदीप पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पत्रकार मिलिंद जाधव यांनी आई मला शाळेला जायचं हाय ही प्रबोधनपर कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमास ठाणे जिल्हा कार्याध्यक्ष संतोष गायकर, जिल्हा उपाध्यक्ष संजय भोईर, वसंत पानसरे, जैतू मुठोळकर, नाना म्हात्रे, मेघनाथ विशे, मिलिंद जाधव, कैलास ढमणे, शेखर भोईर, योगेश गोडे, नितीन पंडित, मोनिष गायकवाड, सचिन पोतदार, सतीश घरत, मनीष दोंदे, संघरत्न घनघाव, राजीव चंदने, अनिल पाटील, जयेश घोडविंदे, अनंत घागस, मयूर किरपण, दीपक हिरे, अनिल गजरे, शिक्षक विनोद गणाचारी, अनिस मेंगाळ, कैलास खडवी, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा सुषमा खंडवी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक जगदीश झिंजाळ यांनी केले, तर आभार प्रदर्शन पत्रकार मिलिंद जाधव यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी भगवान चंदे, मिलिंद जाधव, मेघनाथ विशे आणि कैलास ढमणे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## रांजणी येथे पंचायत समितीचा जनता दरबार

दैनिक यश सिद्धी न्युज नेटवर्क
कळंब /(प्रतिनिधी)

कळंब तालुक्यातील रांजणी येथे पंचायत समितीचा जनता दरबार भरवण्यात आला होता. सर्वप्रथम दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समितीच्या सभापती प्राचार्य राजश्री ताई वरपे या होत्या. त्यांच्या अध्यक्षतेखाली विविध विकास कामे व तक्रारी या जनता दरबारामध्ये घेण्यात आल्या. यामध्ये अंगणवाडीच्या समस्या, शाळेच्या समस्या, उप आरोग्य केंद्र, शेत रस्ते, महावितरण कंपनी च्या तक्रारी, यांच्या सह विविध विषयावर चर्चा व मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेचे समाज कल्याण सभापती विश्वासराव कोकणे, पंचायत समिती उपसभापती प्रणिता चव्हाण, जिल्हा परिषद सदस्य राजाभाऊ शितोळे, पंचायत समिती सदस्य योगेश्वरी पवार, सहाय्यक गटविकास अधिकारी पंचायत समिती मनीषा सुकाळे, विस्तार अधिकारी साळुंखे, आरोग्य अधिकारी, कृषी सहाय्यक, महावितरण अधिकारी, रांजणी पंचायत समिती गणातील पदाधिकारी, यांच्या सह गावचे सरपंच राजाभाऊ आगरकर, उपसरपंच अन्सार शेख, फेरोज पठाण, तंटामुक्त अध्यक्ष मतीन पटेल, माजी सभापती दत्तात्रय साळुंखे, खरेदी विक्री




संघ सदस्य लक्ष्मण देशमुख, बाजार समिती सदस्य प्रवीण चव्हाण, चेअरमन प्रल्हाद गोरे, व्हाईस चेअरमन वाहेद शेख, पत्रकार ताहेर पटेल, गणेश पवार, बद्री धपा धुळे, विकास गिराम, ताडगाव चे सरपंच, लासरा, जायफळ, वाकडी, यांच्या सह विविध गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आयोजित 'संवादवारी' ज्ञानेश्वरी विशेष दालनाचे मुख्यमंत्री महोदय यांच्या हस्ते उद्घाटन

पंढरपूर/प्रतिनिधी : माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने आयोजित 'संवादवारी' ज्ञानेश्वरी विशेष दालनाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार गोपीचंद पडळकर, समाधान आवताडे, अभिजीत पाटील, विजयकुमार देशमुख, राजेंद्र राऊत, उत्तमराव जानकर, नारायणराव पाटील, माजी आमदार प्रशांत परिचारक, माजी आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन प्रशांत परिचारक आदी उपस्थित होते. आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांपर्यंत शासनाच्या विविध योजना पोहोचविण्यासाठी हे विशेष दालन उभारण्यात आले आहे. 'संवादवारी' या उपक्रमातून शासन-जनता संवाद अधिक प्रभावी करण्याचा उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या उपक्रमात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६, महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण, कौशल्य विकास व गुंतवणूक, महाराष्ट्र कृषी कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, नवीन शैक्षणिक धोरण २०२०, कृषी विभागाचे डिजिटल उपक्रम, जलयुक्त शिवार, गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार, महात्मा फुले जनआरोग्य योजना, कामगार कल्याण योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, प्रधानमंत्री पीक विमा योजना, नमो शेतकरी महासन्मान निधी, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, मागेल त्याला शेततळे, लेक लाडकी योजना, पीएम यशस्वी शिष्यवृत्ती योजना, आश्रम शाळा सुविधा, हरित ऊर्जा, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, महाराष्ट्र गृहनिर्माण योजना, दिव्यांग धोरण, शाश्वत जलसंपदा व्यवस्थापन व विकास, आपत्ती व्यवस्थापन, महाराष्ट्र रोजगार हमी योजना आदी योजनांबाबत आकर्षक एलईडी चित्ररथ, पथनाट्य व प्रदर्शनाद्वारे जनजागृती करण्यात येत आहे.



॥ झाडु संतांचे मार्ग ॥ करु पंढरीचा स्वर्ग ॥

**पंढरपूर नगरपरिषद,पंढरपूर**

दुरध्वनीक्र.(02186) 223012
comcpandharpur@gmail.com

स्वच्छ भारत अभियान | स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) | स्वच्छ सर्वेक्षण 2026 | माझी वसुंधरा 7.0

जा.क्र./पंनपं/आरोग्य/3737/2026 दि.21.07.2026

**आषाढी यात्रा 2026**
**यात्रेकरुंना व भाविकांना नम्र आवाहन**

भुवैकुंठ नगरीमध्ये येणाऱ्या भाविक, भक्त यात्रेकरुंचे हार्दिक स्वागत आहे. शहराचे व चंद्रभागा नदीचे पावित्र्य व स्वच्छता राखणे हे आपल्या सर्वांचे आद्य कर्तव्य आहे. सार्वजनिक आरोग्य अबाधित राखणे करीता खालील सुचनांचे सर्वांनी पालन करुन सहकार्य करावे ही नम्र विनंती.

1) **राहण्याची व्यवस्था** :- यात्रेकरु,दिंडीकरी,फडकरी, भाविकभक्त इ. यांची राहणेची सोय भक्ती सागर 65 एकर परिसर या जागेमध्ये केलेली आहे.कोणत्याही धोकादायक इमारती मध्ये राहु नये.
2) **उघड्यावरील अन्न टाळा** :- आपले आरोग्य बिघडू नये म्हणून उघड्यावरील व माश्या बसलेले अन्नपदार्थ, शिळे अन्न आणि नासकी फळे, कापलेली फळे खाणे टाळावे.
3) **शुद्ध पाणी** :- नगरपरिषदेने उपलब्ध करून दिलेल्या शुद्ध व पिण्याच्या पाण्याचाच वापर करावा . नदीचे व बोअरचे पाणी पिऊ नये.
4) **घनकचरा व्यवस्थापन** :- आपल्या मठ/संस्था, वास्तव करणाऱ्या ठिकाणी इ. मध्ये निर्माण होणारा कचरा/पत्रावळी द्रोण, शिळे खरकटे अन्न इ. ओला, सुका असा वेगवेगळा साठवून ठेवावा तो नगरपालिकेची घंटा गाडी आल्यावर त्यामध्येच द्यावा.
5) **शौचालयांचा वापर** :- नगरपरिषद प्रशासनाने ठिकठिकाणी उभारलेल्या तात्पुरत्या व कायमस्वरूपी शौचालयांचाच वापर करावा .तसेच आपल्या वास्तव्याच्या ठिकाणांच्या शौचालयाचा वापर करावा. उघड्यावर शौचास बसू नये.
6) **प्लॅस्टिकचा वापर टाळा** :- पंढरपूर शहरात प्लास्टिक पिशव्यांवर बंदी आहे. पंढरपूर परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी प्लॅस्टिक पिशव्या वापरू नका. कृपया कापडी पिशव्यांचा वापर करावा.
7) **प्रशासनाला सहकार्य करा** :- आपत्कालीन परिस्थितीत पोलीस आणि स्वयंसेवकांच्या सूचनांचे पालन करा.
8) **वैद्यकीय मदत** :- कुठेही त्रास जाणवल्यास तात्काळ जवळच्या नगरपरिषद प्रथमोपचार केंद्र किंवा शासकीय रुग्णालयाशी संपर्क साधावा.
9) **पार्कींग व्यवस्था ठिकाणे** :- अंबाबाई पटांगण,संत गजानन महाराज मठामागे, इसबावी विसावा मंदिर समोर, सांगोला रोड एम.एस.ई.बी.समोर, कुंभार घाट समोर कवठेकर गल्ली,डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर मरिआई पटांगण, कराड रोड वेअर हाऊस जवळ,रेल्वे स्टेशन मैदान,आहिल्या देवी चौक नविन पुलाजवळ, वाखरी पालखी तळ, कुर्डूवाडी रोड गणेश ढाबा पिछाडी इत्यादी ठिकाणी पार्किंग व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**वरील सुचनांचे पालन करणे आपल्या व सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने हितकारक आहे.**

| (श्री. महेश रोकडे) | (श्री. महादेव धोत्रे) | (डॉ. सौ. प्रणिता भालके) |
|---|---|---|
| मुख्याधिकारी | उप-नगराध्यक्ष | नगराध्यक्षा |
| पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर | पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर | पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर |

**रिंगण सोहळ्याचा संस्कृतिक कार्यक्रम**

## कल्याणशेट्टी शिक्षण संकुलातील विद्यार्थी व शिक्षकांनी अनुभवला रिंगण सोहळा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
प्रतिनिधी/अक्कलकोट: कै पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात आषाढी एकादशी निमित्त श्रद्धा, भक्ती आणि समतेचा संदेश देणारा पालखी रिंगण सोहळा व अभंग नृत्याचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. हेची दान देगा देवा तुझा विसर न व्हावा असे विद्यार्थी व विद्यार्थिनींनी अभंगाचा जयघोष करत याची देही याची डोळा, नयनम्य कार्यक्रम रिंगण सोहळा कार्यक्रम अनुभवण्याचे भाग्य लाभल्यामुळे प्रेक्षक पुरते सुखावून गेले.

सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालय, सेमी इंग्लिश व प्राथमिक मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी एकादशी निमित्त रिंगण सोहळा दर्शविणारा संस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

प्रारंभी श्री संत ज्ञानेश्वर महाराज व जगद्गुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराज तसेच शेगावचे गजानन महाराज यांचा जयघोष करत टाळ मृदूंगाच्या तालात हरिनामाच्या गजरात तिन्ही पालख्या विद्यार्थ्यांनी रिंगण सोहळ्यासाठी आणल्यानंतर संस्थेच्या व्यवस्थापनाच्या सदस्या पूनम कोकळगी, रूपाली शहा यांनी विठोबा रुक्मिणीच्या मूर्तींचे पूजन केले. यावेळी संस्थेचे सचिव मल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, दिगंबर जगताप, सिद्रामप्पा पाटील, खंडेराव घाटगे, सुर्यकात रूगे आदी उपस्थित होते.

त्यानंतर प्रांगणात रिंगण सोहळा शिस्त, सेवा सहकार्य आणि सामाजिक ऐक्याचे प्रतीक म्हणून संपन्न झाला. रिंगण सोहळ्यामध्ये पारंपारिक पोषाखातील विद्यार्थी, महिला-पुरुष शिक्षक सहभागी झाले होते. अक्षरशः ज्ञानोबा तुकारामाच्या जयघोषाने शाळेचा परिसर दुमदुमून गेला. पालख्यासमोर विद्यार्थी विद्यार्थिनींनी अभंगाच्या तालावर प्रेक्षणीय नृत्य करून सोहळ्यास रंगत आणली. सर्व जाती धर्मांच्या पंथाच्या मुलांचे एकत्रित गोल रिंग पाहण्यासारखा होता.

रिंगण सोहळा कार्यक्रमाचे प्रस्ताविक निशिगंधा सोमेश्वर यांनी केले, सूत्रसंचलन कल्पना स्वामी व दिगंबर जगताप यांनी केले, सर्वांचे आभार आरती थोरात यांनी मानले.

या उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी, ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी यांनी कौतुक केले.

### शिक्षक विद्यार्थ्यांनी घेतली स्वच्छतेची शपथ

**आषाढी एकादशीच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या रिंगण सोहळा सांस्कृतिक कार्यक्रमात शिक्षक व विद्यार्थ्यांनी सार्वजनिक ठिकाणी घाण करणार नाही, प्लास्टिकचा वापर करणार नाही, स्वत: बरोबर परीसर देखील स्वच्छ ठेवीन अशी शपथ घेतली.**

### समानतेची शिकवण देणारी वारकरी परंपरा प्रेरणादायी

**समाजात प्रेम, बंधुभाव, पर्यावरण संवर्धन, स्वच्छता आणि सामाजिक जबाबदारी याची जाणीव निर्माण करण्यासाठी वारकरी परंपरा प्रेरणादायी आहे. समानतेने वागणे, व्यसनमुक्त जीवन जगणे आणि समाज हितासाठी कार्य करणे हीच विठुरायाची खरी भक्ती आहे असा संदेश संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी यांनी दिला.**

# संकटातील शेतकऱ्यांसाठी देशातील सर्वात मोठी कर्जमाफी देण्याचा शब्द पाळला : मुख्यमंत्री

## 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेअंतर्गत' शेतकऱ्यांना कर्जमुक्ती प्रमाणपत्रांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वितरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेअंतर्गत' सोलापूर जिल्ह्यातील सात शेतकऱ्यांना कर्जमुक्ती झाल्यामुळे प्रातिनिधिक स्वरूपात कर्जमुक्तीचे प्रमाणपत्र आणि जिल्हा बँकेच्यावतीने नव्याने पीककर्जाचे धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज येथे वितरीत करण्यात आले. संकटांमध्ये आलेल्या व कर्ज भरू शकला नाही अशा शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी कर्जमाफी देण्याचा शब्द राज्यशासनाने पाळला असून देशातली ही सर्वात मोठी कर्जमाफी राबविण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.





पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समिती येथे आयोजित सुधाकरपंत परिचारक राज्यस्तरीय कृषी महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार गोपीचंद पडळकर, राजेंद्र राऊत, समाधान आवताडे, अभिजीत पाटील, विजयकुमार देशमुख, उत्तम राव जानकर, नारायणराव पाटील, माजी आमदार प्रशांत परिचारक, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन हरीश गायकवाड आदी उपस्थित होते.

राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणार असल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, नियमित कर्ज भरलेल्या शेतकऱ्यांनाही त्यांच्या खात्यावर ५० हजार रुपये देण्यात येणार आहेत. कर्जमाफीची भव्य सुरुवात करण्याऐवजी पांडुरंगाच्या नगरीत जिथे शेतकरी, वारकरी इतक्या मोठ्या प्रमाणात येतात, तिथून याची सुरुवात करावी या उद्देशाने आज येथून कर्जमाफीची सुरुवात करण्यात येत आहे. त्यानुसार सहकार विभागाने १७ लाख शेतकऱ्यांची पहिली यादी जाहीर केली असून १३ हजार कोटी रुपये या शेतकऱ्यांच्या खात्यावर ३१ तारखेपूर्वीच जमा करण्यात येणार आहेत. यापुढे जसजशी बँकाकडून माहिती जमा होईल तसतशा पुढील याद्या जाहीर करून कर्जमुक्तीची रक्कम जमा करण्यात येईल. एकही पात्र शेतकरी या योजनेतून मागे राहणार नाही, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिला.

ते पुढे म्हणाले, ७.५ हॉर्स पॉवरच्या आतील कृषीपंपांची वीजबिल माफी देण्यासाठी दरवर्षी २४ ते २५ हजार कोटी रुपये राज्य सरकार आपल्या तिजोरीतून महावितरणला देते. आता कर्जमुक्तीबरोबरच यापूर्वीची या कृषीपंपांची थकीत वीज देयकांची रक्कमही माफ करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून ५० लाख शेतकऱ्यांचं ४८ हजार कोटी रुपयांचे वीजबिल माफ केलेले आहे. आता राज्यातल्या ७५ टक्के शेतकऱ्यांना आपण दिवसा वीज देतो आहोत. येत्या डिसेंबर किंवा मार्चपर्यंत १०० टक्के शेतकऱ्यांना आम्हाला दिवसा १२ तास वीज देण्यात येणार आहे.

कर्जमाफी, विजदेयकांच्या रकमेची माफी याव्यतिरिक्त गतवर्षी शेती क्षेत्रामध्ये वेगवेगळ्या सबसिडींच्या माध्यमातून, ठिबक सिंचन, खते, ट्रॅक्टर किंवा यांत्रिकीकरण आदींसाठी सुमारे ९५ हजार कोटी खर्च केले आहेत. शेतकऱ्यांच्या पाठीशी हे सरकार अतिशय ताकदीने उभे आहे, असेही ते म्हणाले.

मुख्यमंत्री म्हणाले, वारीची परंपरा शतकानुशतके चालली असून दरवर्षी लाखो वारकरी चालत चालत पंढरपूरपर्यंत येतात. वारीमध्ये प्रत्येकालाच पांडुरंगाचे दर्शन मिळतेच असे नसले तरी कोणी कळस दर्शन, कोणी मुख दर्शन, नामदेव पायरीचं दर्शन घेतात आणि पांडुरंगाची भेट झाल्याचा अनुभव प्रत्येक वारकऱ्याला या ठिकाणी प्राप्त होतो. वारीच्या परंपरेत प्रत्येक व्यक्ती समोरचा वारकरी, व्यक्तीमध्ये आपल्या माऊलीचे दर्शन घेत असतो. आणि अत्यंत भावनिक आणि कौटुंबिक असा वारीचा सोहळा आपल्याला पंढरपूरमध्ये पाहायला मिळतो.

यावेळी विक्रमी असे ३५ लाखांपेक्षा जास्त वारकरी पंढरपूरला येत आहेत. जवळजवळ २१ किलोमीटरची दर्शनाची रांग यावेळी लागलेली आहे. मात्र राज्य शासन, जिल्हा प्रशासनाच्यावतीने अतिशय उत्तम सेवा करण्याचा प्रयत्न केला आहे. वारकऱ्यांच्या निवाससाठी जर्मन हँगर्स, तेथे पाद्य सेवा, वैद्यकीय सेवा आदी सर्व प्रकारच्या सेवा अतिशय उत्तम पद्धतीने करण्याचा प्रयत्न केला आहे. वारीची परंपरा अशीच वाढत राहणार असून त्याप्रमाणे दरवर्षी सुविधा देण्याचे काम करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

**पंढरपूर कॉरिडॉर अंतर्गत सर्वांचे शंभर टक्के पुनर्वसन**

पंढरपूरच्या कॉरिडॉर विकासाची जवळजवळ सर्व तयारी झाली आहे. काही थोड्या लोकांच्या मनात शंका असल्या तरी चर्चेतून त्या सर्व शंका दूर करून सर्वांचे चांगल्यात चांगले पुनर्वसन करण्यात येणार आहे. महाराष्ट्रातल्या कुठल्याही तीर्थक्षेत्रामध्ये आजपर्यंत झालेल्या पुनर्वसनापेक्षा उत्तम, चांगलं आणि मोठं पुनर्वसन हे या ठिकाणी आम्ही पंढरपूरच्या कॉरिडॉरमध्ये देत आहोत. १०० टक्के लोकांचे समाधान करण्याचा उद्देश घेऊन हे काम आम्ही करत आहोत, असेही ते म्हणाले.

पंढरपूरमध्ये ३०-३० लाख शिस्तबद्ध पद्धतीने लोक येतात. मात्र, अपघात हा सांगून येत नाही. त्यामुळे सर्वांच्या मनामध्ये वारी संपून आणि वारकरी सुखरूप घरी जाईपर्यंत सर्व नीट व्हावे अशी एक भीती असते. या वाढत्या वारकऱ्यांकरता आणि आता देशभरातून दर्शनकरिता येणाऱ्या भाविकांची योग्य व्यवस्था व्हाव्यात, या दृष्टीने खऱ्या अर्थानं या सगळ्या व्यवस्था येथे केल्या असून पंढरपूर कॉरिडॉरमुळे चांगल्या सुविधा निर्माण होतील, असेही ते म्हणाले.

२०१५-१६ साली स्व. सुधाकरपंत परिचारक यांनी पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून या प्रदर्शनाची सुरुवात केली. पंढरपूरला येणारा वारकरी हा शेतकरी, शेतमजूर, बारा बलुतेदार आहे. म्हणून त्यांच्यापर्यंत शेतीच्या क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञान, नवीन प्रयोग पोहोचले पाहिजेत, या दृष्टीने या कृषी प्रदर्शनाची सुरुवात झाली. राज्यातल्या उत्तम बाजार समित्यांमध्ये गणना होत असलेली ही बाजार समिती अतिशय उत्तम कारभार करत असून १६ कोटींपासून प्रचंड मोठी भरारी घेत समितीने मोठा विस्तार केलेला आहे, अशा शब्दात मुख्यमंत्र्यांनी बाजार समितीचा गौरव केला.

**शेतीमध्ये 'एआय'ला चालना; 'महा विस्तार' पचा वापर करावा**

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, आपल्या शेतीमध्ये आधुनिकता आली पाहिजे, उत्पादनाचा खर्च कमी करता आला पाहिजे, उत्पादकता वाढली पाहिजे जेणेकरून शेतकऱ्यांचा नफा वाढला पाहिजे, अशा पद्धतीने आज आपण राज्यात वेगवेगळे प्रयोग सुरू केले आहेत. भविष्यामध्ये शेतीच्या क्षेत्रामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ताचे (एआय) महत्त्व ओळखून, देशात पहिल्यांदा महाराष्ट्राने शेतकऱ्यांकरिता 'महा विस्तार' नावाचे एआय प तयार केले आहे. जवळपास ५० लाख शेतकऱ्यांनी महा विस्तारवर नोंदणी केली असून उर्वरित शेतकऱ्यांनीही या पवर नोंदणी करून उपयोग करावा, असे आवाहन त्यांनी केले.

'महा विस्तार' म्हणजे एक प्रकारचा एआय एजंट असून आपण त्याच्याशी संवाद साधून शेतीशी संबंधित खतांचा वापर, कीड प्रतिबंध, पाण्याचं वापर आदी सर्व विषयांवरील प्रश्नांची उत्तरे, ज्ञान, माहिती जाणून घेऊ शकता. आधुनिक शेतीच्या प्रयोगाचे व्हिडिओ त्याच्यावर असून त्याच्यावर आहे. कुठल्याही नवीन पीक पद्धतीमध्ये काय केलं पाहिजे याची माहिती त्यात असून सगळ्या गोष्टींची माहिती ही प्रत्येक शेतकऱ्याला त्याच्या त्याच्या बोली भाषेत पर्सनलाईझ्ड पद्धतीने तेथे मिळते. पुढील काळात 'माती परीक्षण'पासून सर्व सुविधा, पद्धती या केवळ आपल्या मोबाईलच्या पच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मिळवून देण्यात येणार आहेत, असेही त्यांनी सांगितले.

भीमा नदीवर बॅरेजेस बांधण्याच्या मागणीच्या अनुषंगाने बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, आंतर राज्य लवादाचा निर्णयाची बंधने पाळतानाच त्यातून मार्ग काढून कशा पद्धतीने हे बंधारे तयार करता येतील, या संदर्भातले निर्देश संबंधित विभागाला देण्यात येईल. तसेच चंद्रभागा नदीवरचा जो नवीन पूल आहे, तो आता 'पूल कम बंधारा' असा परिवर्तित करून त्याही ठिकाणी पाणी कसे अडवता येईल, याचाही हा प्रयत्न करण्यात येईल, अशी ग्वाही देखील त्यांनी दिली.

दरवर्षी कोल्हापूर आणि सांगलीमध्ये शिरणाऱ्या पुराच्या पाण्यावर डायव्हर्जन कॅनल आपण सुरू केला असून यावर्षीच त्याचे काम पूर्ण होत आहे. यामुळे ३५ ते ४० टीएमसी पाणी हे तेथून उजनीमध्ये आणण्यात येणार आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यासह येथील दुष्काळी भाग आणि मराठवाड्याचा भाग या दोन्ही भागांना खूप मोठ्या प्रमाणात फायदा होईल. या पाण्यामुळे उजनीमधील मृत साठा वापरावा लागण्याची परिस्थिती पुढील काळात राहणार नाही.

रेल्वे मार्गाच्या अनुषंगाने बोलताना ते म्हणाले, पंढरपूरला तसेच सोलापूर जिल्ह्याला संपूर्ण दक्षिणेशी जोडण्याचे काम निश्चितपणे पूर्ण करू.

लोणंद-पंढरपूर रेल्वेमार्गासाठी आपण पैसे दिले आहेत काम सुरू करायचे आहे. परंतु, पंढरपूर-विजापूर रेल्वेसाठीही मागील काळात केंद्र सरकारला विनंती केली असून त्याचा पाठपुरावा करण्यात येईल, असेही श्री. फडणवीस म्हणाले.

पालकमंत्री श्री. गोरे म्हणाले, शेतकऱ्यांना कर्जमाफी, वीजमाफी देण्याचे काम मुख्यमंत्र्यांनी केले आहे. शेतकरी समृद्ध, मजबूत होईल अशा पद्धतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या कार्यकाळात काम केले आहे. ही वारी वारकऱ्यांना आनंद देणारी स्वच्छ आणि सुंदर अशी वारी होत आहे. जवळपास ३५ लाख वारकरी विठ्ठलाच्या दर्शनासाठी येत आहेत. पंढरीचा कॉरिडॉर च्या माध्यमातून वारकऱ्यांना सुविधा देण्यासाठी पायाभूत सोयी निर्माण करण्याचा मानस मुख्यमंत्री फडणवीस यांना केली आहे. त्यामुळे हे आंतरराष्ट्रीय तीर्थक्षेत्र होईल, असेही ते म्हणाले.

यावेळी श्री. परिचारक यांनी प्रास्ताविकात मुख्यमंत्री यांनी शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी राबविलेल्या योजनांचा गौरवपूर्ण उल्लेख करत कर्जमुक्तीबद्दल मुख्यमंत्र्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमात मुख्यमंत्री यांच्यावरील ' इन्फ्रामॅन : देवेंद्र फडणवीस- मेकिंग ऑफ महाराष्ट्रा' या पुस्तकाचे तसेच निवासी मूकबधिर विद्यालय पंढरपूरच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले.

प्रारंभी मुख्यमंत्र्यांनी प्रदर्शनातील दालनांना भेट देऊन माहिती जाणून घेतली. कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात वारकरी, शेतकरी उपस्थित होते.

# गोपाळपूर येथे स्वच्छ वारी, निर्मल वारी, हरित वारी अभियान उत्साहात संपन्न






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून प्राप्त झालेल्या पत्रानुसार तसेच स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, पंढरपूरच्या राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस) विभागामार्फत दि. २२ जुलै २०२६ रोजी गोपाळपूर येथे 'स्वच्छ वारी, निर्मल वारी, हरित वारी' या स्वच्छता अभियानाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर गोपाळपूर येथून रीद्धी-सिद्धी गणेश मंदिरापर्यंत स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानामध्ये सुमारे १.५ ते २ टन कचरा संकलित करण्यात आला असून त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली. या कार्यक्रमास गोपाळपूरचे ज्येष्ठ नागरिक दिलीप गुरव, पांडुरंग देवमारे, प्रशासक ग्रामपंचायत साईनाथ अडगटाळे, महसूल अधिकारी, विलास मस्के, उदय पवार, अरुण बनसोडे, राजेंद्र बनसोडे, सचिन आसबे, अतुल गुरव, लक्ष्मण लेंगरे, विक्रम आसबे, राहुल माने, गोपाळ म्हेत्रे, दिपक सूर्यवंशी, इकबाल कांबळे तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे पंढरपूर विभागीय समन्वयक डॉ. संजय मुजमुले, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम. पवार, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार, डी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. सतीश मंडवे, पॉलिटेक्निकचे प्रतिनिधी प्रा. अमेय भातलवंडे, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल चौंडे, प्रशासकीय अधिकारी, ज्येष्ठ नागरिक तसेच मोठ्या संख्येने स्वयंसेवक उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान दिलीप गुरव यांनी स्वच्छता, सामाजिक जबाबदारी आणि पर्यावरण संवर्धन याविषयी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. तसेच डॉ. संजय मुजमुले यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना समाजसेवेची प्रेरणा देणारे विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन डॉ. एम. एम. पवार आणि डॉ. नीता तळवलकर यांनी केले. या अभियानाद्वारे स्वच्छता, पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा संदेश देत श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूटच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने समाजापुढे आदर्श निर्माण केला.

**भारताचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वच्छतेबाबत केलेल्या आवाहनास प्रतिसाद म्हणून स्वेरीचे संस्थापक प्रा. डॉ. बी.पी. रोंगे यांच्या दिशादर्शक मार्गदर्शनाखाली संस्थेतील एन.एस.एस. विभाग, स्वयंसेवक व शिक्षक- शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून गोपाळपूर येथे हे स्वच्छता अभियान आयोजित केलेले होते. या अभियानास संस्थेतील सर्व घटकांचा व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.**

## नळदुर्ग येथील महाराष्ट्र बंद आंदोलनात मागणी

# जंतर मंतर दिल्ली येथे विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर नाहक लाठी चार्ज करणाऱ्या सरकारने नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : वैद्यकीय प्रवेश पुर्व परीक्षा नीट या परीक्षेचा पेपर फुटीची जबाबदारी स्वीकारून देशाचे शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यानी राजीनामा द्यावा या मागणीसाठी जंतर मंतर दिल्ली येथे सनदशिर मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नाहक लाठी चार्ज करणाऱ्या पोलीस प्रशासनाच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष श्रद्धेय बाळासाहेब तथा अँड.प्रकाश आंबेडकर यांनी पुकारलेल्या महाराष्ट्र बंद आंदोलनाच्या अनुसंघाने नळदुर्ग तालुका तुळजापूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर संविधान चौकात नळदुर्ग बंदचे अवाहन करून रास्ता रोको करून जाहीर जाहीर निषेध सभा घेण्यात आली यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचे कट्टर शिवसैनिक तथा शिवसेना नेते कमलाकर काका चव्हाण यांच्यासह कार्यकर्त्यांनी विद्यार्थ्यावर झालेल्या बेचुट लाठी चार्ज ची जबाबदारी स्वीकारून नरेंद्र मोदी सरकारने राजीनामा द्यावा अशी जोरदार मागणी केली.



नीट परीक्षेचा पेपर फुटीची जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा नरेंद्र मोदी सरकारने त्यांचा राजीनामा घ्यावा या मागणीसाठी कॉक्रोज जनता पार्टीचे नेते अभिजित दीपके व संशोधक सोनम वांगचुक जंतर मंतर दिल्ली येथे उपोषण आंदोलन सुरू केले होते या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी देशातील शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी प्रचंड मोर्चा काढला हा मोर्चा दडपून टाकण्यासाठी नरेंद्र मोदी सरकारने पोलीस बळाचा वापर करून विद्यार्थ्यावर नाहक अश्रुधुराचा मारा करून लाठीचार्ज केला ही घटना लोकशाहीला काळीमा फासणारी आहे.या निंदनीय घटनेच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीचे नेते श्रद्धेय अँड.प्रकाश आंबेडकर यांनी २३ जुलै रोजी महाराष्ट्र बंदची हाक दिली होती त्या अनुसंघाने वंचित बहुजन आघाडी,महाविकास आघाडी यांच्यासह समविचारी पक्ष कार्यकर्त्यांनी नळदुर्ग ता. तुळजापूर येथे राष्ट्रीय महामार्गावर बसस्थानका समोर डॉ.बाबासाहेब आंबेडकर संविधान चौकात रास्ता रोको आंदोलन करून नळदुर्ग बंद आवहान केले व सत्ताधारी सरकारचा जाहीर निषेध केला या बंदला नळदुर्ग येथील व्यापाऱ्याने आपली दुकाने बंद करून सहकार्य केले.

याप्रसंगी बोलताना शिव सेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे ) चे धाराशिव जिल्हा नेते कमलाकर काका चव्हाण म्हणाले की व्यापारी म्हणून आले आणि राज्यकर्ते बनलेल्या इंग्रज सरकारकडून पारतंत्र्याच्या काळात जालियनवाला बाग सत्याग्रहात स्वातंत्र्य ची मागणी करणाऱ्या भारतीय क्रांतिवीरावर इंग्रज सरकारकडून ज्या प्रकारे लाठी चार्च करण्यात आला होता. त्याच प्रकारे गुजरातचे व्यापारी नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्या सरकारकडून स्वातंत्र्याच्या काळात सनदशिर मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यावर लाठीचार्ज झाला ही घटना अत्यंत निंदनीय असून या घटनेची नैतिक जबाबदारी स्वीकारून नरेंद्र मोदी सरकारनेच राजीनामा द्यावा.अशी जोरदार मागणी या प्रसंगी कमलाकर काका सह आंदोलनकर्त्या कार्यकर्त्यांनी केली.

याप्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे अंकुश लोखंडे, तुळजापूर तालुका अध्यक्ष विनोद भंडारे,भीम कन्या स्नेहा झेंडारे,राष्ट्रीय काँग्रेस चे नगर सेवक इमाम शेख,राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार)चे युवा कार्यकर्ते ताजोदीन शेख,शिवसेना (उबाठा) चे नळदुर्ग शहराध्यक्ष संतोष पुदाले रिपाइं चे बाबासाहेब बनसोडे अरुण लोखंडे एस. के.गायकवाड आदींची ही सरकारच्या निषेधार्थ भाषणे झाली.

याप्रसंगी वंचित बहुजन आघाडी व महाविकास आघाडी चे कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.